# वृद्धांच्या व लिंगभाव अस्थिरता समस्यांबाबत जनजागृतीचा अनोखा प्रयोग यशस्वी

नुकताच IMA तर्फे रत्नागिरीतील डॉक्टर मंडळींनी शहरातील स्मशानभूमीत विद्युत दाहिनीच्या मदतीकरिता सावरकर नाट्यगृहात एक नाट्यप्रयोग सादर केला "आम्ही मुरलेले" हे नाटकाचे शीर्षक, ज्येष्ठ नागरिक अर्थात वृद्धांना उद्देशून असलेले यात दोन ज्वलंत समस्यांबाबत पहिल्या अंकात विनोदी पद्धीने तर दुसऱ्या अंकात गंभीरपणे वाचा फोडण्याचं काम या नाटकातून करण्याचा मानस होता आणि तो बऱ्याच अंशी सफलही झालाय असं म्हणायला हरकत नाही.

वृद्धांचा एकाकीपणा, शारिरीक हतबलता, तरूणांच्या व्यस्त जीवनामुळे, करिअरमुळे त्यांचे वृद्धांकडे होणारे दुर्लक्ष, त्यातून वृद्धांमध्ये निर्माण होणारे नैराश्य या बाबी लेखक, दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार डॉ. निनाद नाफडे, डॉ. निलेश नाफडे तसेच त्यांच्या संपूर्ण टीमने अगदी हलक्या फुलक्या विनोदी शैलीतून सादर करण्याचा यशस्वी प्रयत्न पहिल्या अंकात केला आहे. वृद्धांनी आपलं उर्वरित आयुष्य आपल्या कलागुणांना जोपासत वृद्धाश्रमासारख्या ठिकाणीही समवयस्क व्यक्तींसोबत अगदी दिलखुलासपणे जगावं असा संदेश यातून दिला.

दुसऱ्या अंकात मात्र "लैंगिक अस्थिरता" या सामाजिक समस्येवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकाच व्यक्तीमध्ये कधी स्त्रीलिंगी तर कधी पुरूषलिंगी भावना जागृत होवून त्यानुसार त्याचं वागणं बोलणं, पेहराव दिसून येतो. आपल्यातील हा दोष समाजाला कळला तर... समाज आपल्याला स्वीकारेल का? आपणही इतरांप्रमाणे आपला संस्कार थाटू शकतो का? आपल्यालाही मनाप्रमाणे जोडीदार मिळेल का? अशा विमनस्क अवस्थेत ही माणसं जगत असतात. अशावेळी जर त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या तर त्यांच्या हातून मनुष्यवधासारखा निर्घृण गुन्हाही घडू शकतो याला जबाबदार कोण? असा सवाल निर्माण करून हे नाटक संपतं.

कोकणात प्रथमच भव्य एलईडी स्क्रिनचा अत्याधुनिक वापर करून नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने फ्लॅशबॅक, स्वप्नरंजन तसेच अंधारातील घटना दाखवण्याचा प्रयत्न प्रेक्षकांना नाविन्याचा सुखद अनुभव देऊन जातो. नाटकातील गाणी, संगीत तसेच नृत्यही प्रेक्षकांना गुणगुणायला, डोलायला लावते. आपला डॉक्टरी व्यवसाय सांभाळून सामाजिक बांधिलकी जोपासताना अभिजात रंगकर्मीप्रमाणे अभिनयाला न्याय देण्याच्या बाबतीत रत्नागिरीतील डॉक्टर मंडळी खरोखर 'मुरलेली' आहेत असं अभिमानाने म्हणावंसं वाटतं. डॉ. नाफडे बंधू, डॉ. नितीन चव्हाण, डॉ. शशांक पाटील, डॉ. कृष्णा व माधुरी पेवेकर, डॉ. रविंद्र व मेधा गोंधळेकर, डॉ. भोगटे, डॉ. मयूर कांबळे यांनी आपलं 'मुरलेपण' पुन्हा एकदा सिद्ध केलंय. स्वखर्चाने महाराष्ट्रात ठिकठिकाणी हा प्रयोग सादर करून त्यांचा भव्य, दिव्य असा संकल्प तडीस जाण्यासाठी रत्नागिरीकरांनी त्यांना उत्स्फूर्तपणे साथ द्यावी हीच अपेक्षा! त्यांच्या पुढील प्रयोगांना मनःपूर्वक शुभेच्छा!

श्रद्धा कळंबटे
रत्नागिरी